
# व्यक्ती-वल्ली - चित्रकार व गायक पं. सुजन राणे




प्रिय हितचिंतक,

शास्त्रीय गायन व चित्रकला ह्या दोन्हीमध्ये उस्ताद असलेले माझे स्नेही पंडित सुजन राणे ह्यांचेवर हा आजचा लेख. हे सुजन अमेरिकेतच नव्हे तर भारतातही नांवाजलेले आहेत. परवाच ते भारतात एक मिशन घेऊन गेले आहेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्याचे. सुजनना मी त्यांचे मिशन सफल होवो ही सदिच्छा व्यक्त करतो.

आपला.

जयंत.




***१) पं. सुजन राणे एका मैफिलीत गातांना…२) त्यांचे पुस्तक, Learning Hindustanee Classical Vocal Music…३) त्यांचे काका सुर्यकांत राणे, हिंदी सिनेसृष्टीतले पहिले महाराष्ट्रीय संगीत दिग्दर्शक…४) सुजन राणे व मी, फिलाडेल्फियाच्या बृ.म.मं.अधिवेशनात, माझ्या पुस्तकासह…***

एके दिवशी मला न्यू जर्सीहून पं. सुजन राणे यांचा फोन आला व म्हणाले की, 'जयंतराव, तुमच्या संगीत संग्रहाबद्दल खूप ऐकून आहे व तुमचे लेख मी वाचतो. मला शास्त्रीय संगीतावर आधारित हिंदी सिनेमातील कांही दुर्मिळ गाणी हवी आहेत ती मिळत नाहीत, तुमच्याकडे असल्यास तुम्ही द्याल कां...? त्याची यादी मी ई-मेलवर पाठवितो.' ती यादी मिळाल्यावर सर्व गाणी मी पंडितजींना पाठवून दिली होती. आणि नंतर आमची लयबद्ध अशी सुरीली मैत्री जुळली. असंच एकदा, रंगदीप दिवाळी अंकासाठी बाल गंधर्व यांचावर लेख लिहून द्या म्हणून त्याच्या संपादकाचा मला फोन आला. मी तो लेख लिहिण्यास पात्र नव्हतो. म्हणून मी तो स्वतः न लिहिता, पं. सुजन राणे यांना लिहिण्याची विनंती केली होती. पंडितजींनी व रंगदीपच्या संपादकांनी ती विनंती मान्य केली व तो लेख राण्यांनी उत्तम लिहून पाठविला होता. परंतु, त्याचे श्रेय पंडितजींनी मला दिले होते व ते त्यांनी त्या लेखात सुरुवातीलाच नमूद केले होते हा पंडितजींच्या मनाचा मोठेपणा खूप कांही सांगून गेला होता.

"मला शास्त्रीय संगीत कळत नाही. पण त्यात मला रस नाही असं नाही. किंवा राग-दारी म्हणून त्याच्या दरबारात शिरलो नाही असेही नाही. माझा खरा जीव गुंतला होता तो जुन्या हिंदी गाण्यात. आणि तो माझा आत्मा होता-आहे. तसेच सकाळ, दुपार, संध्याकाळ, व रात्री कुठले राग़ गायिले जातात त्याची माहिती मला आहे. जे सांगोत कानाला मधुर लागतं ते गीत मला आवडतं. आणि प्रत्येक चांगल्या गाण्यामागे शास्त्रीय संगीताचा पाया असतो किंवा त्या संगीतावर ते आधारित असतं असं माझे मत. थोडक्यात मी तानसेन असलो तरी कानसेन आहे याचा मला अभिमान आहे. असो.




***१) पं. सुजन राणे यांना एका नामवंत इंग्रजी मासिकात प्रकाशित झालेल्या लेखासह मिळालेली प्रसिद्धी... २) सुजनसाहेब व त्यांचे गुरु पं. फिरोझ दस्तूर... ३) पं. भीमसेन जोशी समवेत पं. सुजन राणे...***

"अहो, मुंबईत जेव्हा टेलिव्हिजन सुरु झाला तेव्हा टेलिव्हिजनवर जी. एन. जोशी यांनी पं. भीमसेन जोशी यांची दोन भागात मुलाखत घेतली होती त्याचे थेट प्रक्षेपण दाखविले होते. त्यात दुसऱ्या भागात जोशी साहेबांनी पंडितजींना विचारले की, आता तुमची साता समुद्रापलीकडे भ्रमंती होऊन कीर्ती मिळवीत आहात. तेव्हा पंडितजींनी त्यांना विनोदाने उत्तर दिले की अहो माझंच काय, आता कावळेही तेथे जातात.

तेही गातात..."

"हिंदी चित्रपटातील सुप्रसिद्ध जुने विनोदी नट मेहमूद जेव्हा आमच्या न्यू यॉर्कच्या घरी आले होते तेव्हा त्यांनी ह्या शास्त्रीय मैफिलीवरून एक गमतीदार किस्सा ऐकविला होता. तो असा की, ते एकदा प्रभादेवीच्या रविंद्र नाट्यमंदिरात पं. भीमसेन जोशी यांच्या कार्यक्रमाला गेले होते. तेथे बरीच प्रतिष्ठित मंडळी आली होती. त्यांच्या पुढच्या रांगेत स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर बसल्या गोत्या. पंडितजींचे गाणं रंगात आले असतां त्यांनी अशी कांही एक तान घेतली ती ह्या मेहमूदसाहेबांना भलतीच आवडली. मेहमूदसाहेबांना ती तान फिल्मी वाटल्याने हात वर करून 'वाह, क्या बात है' असे म्हणाले. सभागृहात शांतता होती व ह्या मेहमूद साहेबांचीच एकमेव दाद होती. तेव्हा, लताबाई यांनी रागाने मागे वळून म्हटले की, 'मेहमूदजी आपको कुछ मालूम नहीं तो तारीफ न किजिये.' तेव्हा, मेहमूद खूप ओशाळले होते व त्या संपूर्ण कार्यक्रमात तोंडाला कुलूप लाऊन बसले होते." ही सर्व कहाणी मी पं. सुजन राणे यांना ते जेव्हा माझ्या घरी मला खास भेटायला आले होते तेव्हा सांगितली होती. त्यांनी मला अनेकदा त्यांच्या घरी बोलाविले होते परंतु, कांही कारणांनी मला ते जमले नव्हते. शेवटी मीच त्यांना म्हटले की तुम्ही या. तो हा योग आला होता. दरम्यान, त्यांना न सांगता मी त्यांची मुलाखत घ्यायची असा बेत आखला होता. तो सप्तसुरात सुरळीत पार पडला होता.



***सुजन राणे यांची तैलचित्रे: १) गंगुबाई हंगल...२) बेगम अख्तर...३) पं. रवि शंकर...४) पं. भीमसेन जोशी...***

हे सुजन राणे अत्यंत साधे, नम्र, व प्रामाणिक. नांवाप्रमाणेच सुजन. यांचा जन्म एका मध्यम वर्गीय पाठारे प्रभू कुटुंबात मुम्बईत १९३६ साली झाला होता. एखाद्या व्यक्तीत एका वेळी दोन कलांचा अंतर्भाव झालेला सहसा आढळत नाही. परंतु निसर्ग काही लोकांना हे वरदान चुकून देतो की काय असं त्यांना वाटतं. कारण, त्यांच्या वडिलांनी, केशवरावांनी, ते स्वतः उत्तम चित्रकार असूनही मुलाला-सुजनना चित्रकलेत उत्तेजन कधीही दिले नाही. कदाचित काळाची तशी गरज होती असे त्यांच्या वडिलांचा समज होता. त्यातून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चित्रकलेचा राजाश्रयही निघून गेला. त्या कलेत व्यावसायिकदृष्ट्या फायदा नव्हता हे प्रमुख कारण होते. शिवाय, महाराजांच्या काळातील पूर्वीचा तो चित्रकारांचा राजाश्रय, त्यांना मिळणारे मुबलक दाम, व ख्याती हे नाहीसे झाले होते. असे असूनही जिद्दीने व प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सुजन ह्यांनी शाळेपासून चित्रकलेत लक्ष घातले व वडिलांच्या न कळत त्यांचा

आदर्श डोळ्यासमोर ठेऊन त्यात अभिनंदनीय प्रगती केली होती.

कालांतराने सुजनना आखाती देशात आंतरदेशीय बँकेत अधिकाऱ्याची नोकरी चालून आली व हा योग आर्थिक दृष्ट्या त्यांना भाग्याचा ठरला होता. तिथे अनेक वर्ष्ये नोकरी करता करता त्यांनी जोपासलेल्या चित्रकलेला बहर आला होता. तेथील राजा सुलतान काबूस यांचं भलं मोठ तैलचित्र सुजननी रंगविलं होतं. ते चित्र पहायला बरेच प्रेक्षक मिळाले पण त्याला कुणी वाली सापडला नव्हता. अखेर ते चित्र तेथील बँकेचे डायरेक्टर शेख शकसी यांच्याकडे आहे. (त्या चित्राच्या एका बाजूला क्रिकेटर अजित वाडेकर तर दुसऱ्या बाजूला मी उभा आहे असे ते आहे. त्यावेळी वाडेकर भारतीय क्रिकेट टीम घेवून आखाती देशांत गेले होते.) हे चित्र पाहून तिथल्या राजघराण्यातल्या मेहमूद नावाच्या एका शेखने त्यांच्या महालातील युरोपिअन चित्रकारांच्या इतर चित्रांची डागदुजी करायची इच्छा प्रगट केली होती. पण ती सुजननी नाकारली होती व त्या बदली सुलतान काबूसचं त्यांच्या बरोबरचं तैलचित्र काढून त्यांना दिलं होतं. जेव्हा त्या बँकेत शेख मेहमूदचा लाख रुपयाचा चेक आला तेव्हा, सुजन यांचे चित्रकलेतील कौशल्य तेथील सर्वांच्या लक्षात आलं होतं व त्यांची प्रशंसा झाली होती.

सुजन नंतर मुंबईला परतल्यावर त्यांनी नेहरू आर्ट सेंटरमद्धे भारत-रत्न भीमसेन जोशी, बिस्मिल्ला खान, अब्दुल करीम खान, फैय्याज खान यांच्या सारख्या शास्त्रीय संगीतातल्या वीस कलाकारांची तैलचित्र एकाचवेळी प्रदर्शित केली होती. असेच प्रदर्शन पुढे त्यांनी मुंबईच्या षण्मुखानंद हॉलमध्ये भरवलं होतं. ते इथेच थांबले नाहीत तर, Canada, Calgariत त्यांनी बृहन महाराष्ट्र मंडळाच्या २००१ च्या अधिवेशनात, ह्या सर्व शास्त्रीय कलावंतांच्या तैलचित्रांचे प्रदर्शन एका दालनात भरविले होते. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. त्यावेळेचे राजकीय पुढारी मनोहर जोशी, ह्रृदयरोगतज्ञ डॉ. नीतू मांडके, व सकाळचे संपादक प्रतापराव पवार अशा अनेक मान्यवर व्यक्तींनी ह्या प्रदर्शनाला भेट दिली होती. आणि सुजन यांचे कौतुक केले होते. तसेच, २०१० साली न्यू यॉर्कमध्ये एका खाजगी लिलावामध्ये त्यांची लता मंगेशकर, बेगम अख्तर, गंगुबाई हंगल व झाकीर हुसेन यांच्यावरची तैलचित्रे विकली गेली होती. Texas, Maryland व New Jersey मध्येही खासगी संग्रहासाठी त्यांनी अनेक तैलचित्रे काढली आहेत. Baltimore ला एका दिवंगत पत्नीचे चित्र पाहून तिच्या पतीच्या डोळ्यात चटकन अश्रू आले होते ही सुजनना मिळालेली खरी पावती होती. नुकतेच त्यांनी पं. रवी शंकर, बेगम अख्तर, तबला नवाज उस्ताद तिरख्वा व स्वामी विवेकानंद यांची तैलचित्र काढली आहेत. आणखी दोन महत्वाच्या व्यक्तींची तैलचित्र म्हणजे, American Senator & Chairman of Roma Asian Bank Mr Peter Inverso आणि Swami Chinmayanand for Chinmaya Mission Plainsboro, New Jersey.



***२) सुजनचे वडिल केशवराव राणे यांनी काढलेले डॉ. एम. आर. जयकर यांचे तैलचित्र…The same portrait painted by sujan’s father Keshavrao in 1932 soon after Dr. Jayakar returned to India after attending the Round Table Conference with Mahatma Gandhi and other Indian leaders in London. २) सुजनने काढलेले स्वामी विवेकानंद यांचे तैलचित्र… ३) सुजनने घरात रंगवलेली मैफिल…***

असे हे सुजन राणे. वडिलांकडून चित्रकलेची त्यांना गोडी लागली होती. परंतु, फार उशीरा शास्त्रीय संगीताकडे वळले तेव्हा त्यांच्यावर हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे संस्कार त्यांच्या काकाकडून झाले होते. त्यांचे काका सूर्यकांत राणे हे हिंदी सिनेसृष्टीतले पहिले महाराष्ट्रीय संगीत दिग्दर्शक होते. त्यांनी आलम आरा (१९३१) ह्या पहिल्या हिंदी बोलपटानंतर त्याच वर्षी (१९३१) वीर अभिमन्यू ह्या हिंदी बोलपटाला चाली दिल्या होत्या. त्यावेळी शास्त्रीय संगीतात ते निष्णात पेटीवादक म्हणून ओळखले जात होते. (पुण्यात झालेल्या चित्रपट शताब्दी महोत्वात मी ह्या सूर्यकांत राणे यांचा फोटो माझ्या दुर्मिळ फोटो प्रदर्शनात प्रसिद्ध केला होता.) या शिवाय अब्दुल करीम खानच्या ध्वनिमुद्रिका रेडिओवर वारंवार घरी ऐकल्यामुळे संगीताचे संस्कार सुजन यांच्यावर अगदी लहानपणापासून घडत गेले होते. सुरवातीला त्यांनी ग्वाल्हेर घराण्याचे पं ग़ोविन्द प्रभू व त्यानंतर किराणा घराण्याचे पं राजारामबुवा यांच्याकडून तालीम घेतली होती. परंतु, किराणा घराण्याचे नावाजलेले गवई पं. फ़िरोझ दस्तूर यांच्याकडून त्यांनी नियमीत तालमी घेतल्या व त्यांचा सहवास त्यांना जवळ जवळ ३५ वर्ष लाभला होता. य़ा अवधीत त्यांनी पुण्यातील सवाई गंधर्व संगीत महोत्सव, मिरजेतील अब्दुल करीम खान संगीत महोत्सव अशा अनेक मैफिलीत आपले गुरु पं. फ़िरोझ दस्तूर यांना साथ केली होती. सुजन यांनी आत्तापर्यंत भारतात, आखाती देशांत आणि अमेरिकेत १९८० पासून अनेक मैफिली यशस्वीपणे सादर केल्या आहेत. अमेरिकेत त्यानी "Learning Hindustanee Classical Vocal Music" हे अनिवासी भारतीयांसाठी इंग्रजी पुस्तक प्रकाशित केलं आहे. ह्या पुस्तकाचा स्वीकार Princeton University Library, Princeton ,Canadian National Liabrary, Ottawa, London City Library, London, Bombay University Library, Mumbai, ITC Sangeet Research Library, Calcutta, Pune  University Library, Pune आणि

NCPA Library, Mumbai यांनीहि स्वीकार केला आहे. गेल्या १५ वर्षात त्यांनी खालील नावाजलेल्या संस्थांमद्धे मैफिली सादर केल्या आहेत. आता ते व्यावसाईक गायक म्हणून ओळखले जातात. हे निश्चितच भूषणावह आहे.

सुजन राणे यांचे वडील म्हणजे विख्यात चित्रकार केशवराव राणे. गेल्या शतकांत भारतांत जे काही नावाजलेले चित्रकार होउन गेले त्यांत हे केशवराव राणे यांचे नांव घेतलं जातं. त्यांचे वडील पांडुरंग राणे हे त्यावेळी नाशनाल द पारी ह्या फ्रेंच बंकेत नोकरीला होते. वडिलांची मध्यम परिस्थिती व तीन भाऊ, तीन बहिणी असल्यामुळे केशवरावांना उच्च शिक्षणाकडे नाईलाजाने वळता आलं नव्हतं. मात्र, केशवरावांची चित्रकलेकडे नैसर्गिक ओढ होती. वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी कृष्णावर एक अतिशय सुंदर रंगीत चित्र काढलं होतं ते त्या वेळच्या जे ज़े. स्कूल ऑफ आर्ट्सचे प्रिन्सिपल सर ग्लॅडष्टन सोलोमन यांच्या नजरेत भरले होते. सोलोमननी त्यांचे चित्रकलेतले कौशल्य पाहून त्याना लगेच शाळेत प्रवेश दिला. त्या वेळचे शाळेचे हेड मास्तर नावाजलेले चित्रकार राव बहादूर धुरंधर ह्यांनाही केशवरावांसारख्या लहान विद्यार्थ्याचे कौतुक वाटले होते. पुढे ते जी. डी  आर्ट. मध्ये पदवीधर होऊन त्या शाळेचे फेलो झाले व तिथे शिकवीत होते. त्यांच्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांची नांवे घ्यायची झाली तर ती चित्रकार देवूस्कर, धोपेश्वरकर, नगरकर, गोंधळेकर, चिमुळकर, गुर्जर व टाइम्स ऑफ इंडियाचे पी. जी. सिरूर ही होत.




***१) Sheikh Sultan Qaboos Ruler of Oman चे सुजनने काढलेले तैलचित्र ...२) तबला नवाज उस्ताद तिरख्वा...२) तबला नवाज उस्ताद तिरख्वा ३) स्वामी चिन्मयानंद यांच्या तैलचित्रासोबत सुजन राणे...***

सोलोमनच्या हाताखाली त्यांना दिल्लीच्या वाईस रिगल लॉज (सध्याच राष्ट्रपती भवन) मध्ये भिंतीवरील भव्य  (mural painting) चित्र काढण्याच भाग्य लाभले होते. चित्रकार व जे.  जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे हेड मास्तर बहुलकरांच्या व चित्रकार दलालांच्या दीपावली (२०११) मधल्या लेखांत त्यांचा आवर्जून उल्लेख केला आहे. काही काळ केशवराव हे मुंबईच्या फ्रेंच पुलाजवळ राघववाडीत आपले चित्रकलेचे वर्ग चालवीत होते. त्यांच्या जवळच्या इमारतीत प्रसिद्ध चित्रकार हळदणकर हे सुद्धा आपले

वर्ग चालवीत असत. कालांतराने केशवरावाने स्कूल ऑफ आर्ट्स सोडलं आणि चित्रकलेच्या जगात स्वतंत्र स्थान प्रस्थापित केले. व्यक्तीचीत्रांत (portrait-painting) त्यांचा हातखंडा होता.

त्यावेळच्या अनेक महाराजांची मोठी तैलचित्र काढण्याच्या मागण्या त्यांच्याकडे येत असत. त्यांत कोल्हापूर, रामपूर, बडोदा व इतर काही संस्थानांची नावं घ्यावी लागतील. हैदराबाद्चे राजा धनराजगिरजी यांनी त्याना आपल्या हैदराबादच्या महालासाठी काही तैलचित्र काढण्यासाठी स्वतःकडे सहा महिने ठेवून घेतले होते. त्याचप्रमाणे, धनराजगिरजीनी मुम्बईच्या रिगल सिनेमा जवळच्या आपल्या महालांसाठी तैलचित्र काढण्यासाठी त्याना करारबद्ध केलं होत. Freedom-fighter Baristar M.R. Jayakar यांच्या मलबार हिलच्या घरासाठी केशवरावांनी बरीच तैलचित्रे काढली होती. बॉम्बे आर्ट सोसायटी, इंडियन आर्ट सोसायटी व शिमला आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात अनेकदा आपली तैलचितत्रे प्रदर्शित केली होती. तसच टाइम्स ऑफ इंडियाच्या एके काळच्या Illustrated Weekly of India च्या मुखपृष्टावर बऱ्याच वेळा त्यांची चित्रे प्रकाशित झाली आहेत. दुर्दैवाने असे म्हणावे लागेल की, काळाच्या ओघात काही चित्रकारांची नावं पुसली जातात किंवा गेलीत ती लोकासमोर आली नाहीत त्यापैकी एक केशवराव राणे होते.

मुलाखत झाल्यानंतर पंडितजींनी मला त्यांच्या कांही चीजा-बंदिशी मनसोक्त ऐकविल्या. मी तृप्त झालो होतो. त्याचबरोबर, त्यांच्या तैलचित्रांचे कांही फोटो मला भेट म्हणून दिलेत. घरी येउन मला ही त्यांनी एक प्रकारे मेजवानीच दिली होती. मी सुखावलो होतो. पं. सुजन राणे यांचा लौकिक व कारकीर्द निश्चित वाखाणण्यासारखी आहे. मग, प्रश्न असा पडतो की हे गायक म्हणून कां चित्रकार म्हणून श्रेष्ठ आहेत…

Please log on https://www.youtube.com/watch?v=WR2mxkqOBV8 for Sujan's YouTube recital at https://www.youtube.com/watch?v=WR2mxkqOBV8 as well.

**भारतात झालेल्या शास्त्रीय संगीत मैफिलीचा हा आढावा:**

Abdul Karim Khan Sangeet Mahotsav, Meeraj.
Benaras Hindu University, Varanasi.
ITC Sangeet Research Academy, Calcutta,
Kannan Sangeet Kunj, Calcutta.
Tata Institute of Fundamental Research, Mumbai.
Kala Academy, Goa.
Anahatnaad Sangeet Mahotsav,Goa.
Kirana Sangeet Academy,Bangalore.
Instituite of World Culture, Bangalore.
Indian Cultural Center, New York.
Shiv-Vishnu Temple, Maryland.
Swanand Sangeet Sabha, Mumbai.

पंडित सुजन राणे यांचा गेल्या वर्षी फोन आला व म्हणाले, *"जयंतराव, मला माझी सर्व पेंटिंग्स एखाद्या संस्थेला दान करायची आहेत. यावर तुम्ही योग्य तो सल्ला द्या व कुठे देऊं ते सुचवा."* मी त्वरित सुजनसाहेबांचं अभिनंदन केलं व सांगितलं, *"पंडितजी, अमेरिकेत बिल्कुल दान करण्याच्या फंदात पडू नका. कारण, तुमची सर्व पेंटिंग्स अत्यंत मौल्यवान असून ती सर्व दिग्गजज भारतीय शास्त्रीय संगीतकारांची व गायकांची आहेत. ती योग्य ठिकाणीच जायला हवीत. आणि त्यासाठी भारताची सहल करावी लागेल. परंतु, तत्पूर्वी अथवा जाण्यापूर्वी त्याचा शोध घ्यावा, संशोधन करा आणि मग कुठे दान करायचं ते तुम्ही ठरावा."* थोडक्यात, दिल्यानंतर किंवा दान केल्यावर ती धूळ खात पडून राहूं नयेत. हा माझा सल्ला होता. यानंतर कांही काळ-महिने निघून गेले. सुजनसाहबेबांचा व माझा संपर्क अथवा संवाद ठप्प झाला होता. कदाचित, ते एक महत्वाच्या मिशन अथवा प्रॉजेक्टमध्ये गर्क असतील असा तर्क केला होता. आणि अचानक परवा मला राणेसाहेबांची बडोद्याहून एक सविस्तर मेल आली. म्हणजे, सुजनसाहेब भारतात गेले होते. ते कळलं. परंतु, त्यांची ती मेल ऐतिहासिक, आनंददायी व अभिनंदनीय होती. तोच आनंद येथे पेश करीत आहे...

Please check at https://fb.watch/3jEDxPc8aB/ and here for more info: https://www.facebook.com/watch/?v=2488594741434352








***१-२-३) अभ्यासक, चित्रकार व गायक पंडित सुजन राणे यांनी त्यांचा मौल्यवान पेंटिंग्स Baroda Universityच्या Music Dep. दान केल्यानंतर त्यांचा Baroda Universityच्या Music Dep. तर्फे झालेली कार्यक्रमाची टीव्हीवरील बातम्यांच फोटो...*** *खाली:* ***१) कार्यक्रमात आदरणीय पंडित सुजन राणे दीप प्रज्वलित करतांना... २) भाषण व गायन करण्यापूर्वी... ३) रसिक प्रेक्षकांसमोर शास्त्रीय गायन सादर करतांना पं. सुजनसाहेब...*** *सर्व फोटो पंडित सुजन राणे यांच्या सौजन्याने...*




परोपकारी व उत्साहमूर्ती राणेसाहेबांनी त्याची सर्व अनमोल पेंटीग्स बडोद्याच्या नामवंत सयाजीराव युनिव्हर्सिटीच्या संगीत क्षेत्रातील विद्याशाखेला दान केली हे कळलं. मंडळी, माझ्यामते ही अत्यंत सुखद-सर्वोत्तम-अभिनंदनीय वार्ता म्हणजे, आदरणीय चित्रकार व सुरीली राणेसाहेबांच्या संगीत जीवनातील सुवर्ण कळसाची होती..! अमेरिकेत व भारतात त्यांचा परिचय सर्वांना आहे. परंतु, या निमित्ताने आज मला आमचे जवळचे विनम्र स्नेही, विद्वान, अभ्यासक, चित्रकार व गायक पंडित सुजन राणे यांची येथे थोडीशी वैयक्तिक ओळख करून देणं महत्वाचं वाटलं. कारण, नुकतेच त्यांनी केलेल्या दानशूर कार्याबद्दल त्यांना जे मानसन्मान मिळाले-लाभले व एका मराठी माणसाची योग्य ती प्रसिद्धपूर्वक दखल गुजरातमध्ये सर्वत्र घेतली गेली. हे निश्चित कौतुकास्पद होतं.*'एक हाती टाळी वाजत नाही'* हे आपण जाणतां. आणि प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या मागे स्त्रीची भूमिकाही महत्वाची असते. कर्तबगार सौ. नीलिमाताई यांचंही आम्ही मनापासून अभिनंदन करतो. तसेच, त्या दोघांना उत्तम आरोग्य लाभो ही सदिच्छा व्यक्त करतो. आता त्यांनी फावल्या वेळात आत्मचिंतन करून आपलं आत्मचरित्र लिहायला घ्यावं व चांगल्या प्रकाशकाकडून ते प्रकशित करावं अशी माझी इच्छा मी बोलून दाखविली आहे. आणि ते त्या विचारातही असतील... आणि हो, जाता जाता असं सूचित करावसं वाटतं की, BMM, Marathi Vishwa व Club 55ने न विसरतां आमच्या आदरणीय पंडित सुजन राणे यांचा जाहीरपणे गौरवपूर्ण Lifetime Achievement-आजीवन कामगिरीबद्दलचे पारितोषिक देऊन योग्यप्रकारे पुरस्कार-सन्मान करावा अशी माझी नम्र व प्रामाणिक विनंती आहे. तसेच, ही माझी हांक ऐकायला गेली तर, उत्तर अमेरिकेतील तमाम मराठी समाज आमच्यासह धन्य पावेल. असो. आपला प्रतिसाद हा पंडिजींना मिळाली योग्य 'दाद' असेल यात शंका नाही.

धन्यवाद

**जयंत विठ्ठल कुळकर्णी**.
jvkny1@gmail.com